श्रीगोपालकविविरचितं

# श्रीमन्नरसिंहसरस्वतीमानसपूजास्तोत्रम्।

मूळ अर्थ व टीपांसह

प्रस्तावना लेखक

श्री अप्रबुद्ध

व्यासपूजा—१८६८

राष्ट्रीय संस्कृति मन्दिर

गीर्वाणभुवन नागपूर.

मूल्यम्—आठ आणे

|| श्रीः ||

तदिदं महाराष्ट्रं यत्तत्रभवद्भिः श्रीसमर्थरामदासस्वामिभि'रानन्द-
वनभुवन'शब्देन गीतम् । तस्य च राष्ट्रियो ग्रन्थः श्रीगुरुचरित्रं नाम ।
सन्ति चापरेपि तदानीन्तना राष्ट्रिया ग्रन्थाः श्रीज्ञानेश्वरी-श्रीदासबोध-
प्रमुखाः । प्रतिबिम्बितं च खल्वेषु सकलं हृदयं महाराष्ट्रजनतायाः । न
त्वेतेषु सन्दृश्यते परिपूर्णा मूर्तिर्महाराष्ट्रस्य । श्रीगुरुचरित्रे तावन्न केवलं
हृदयमपि तु मूर्तिसौन्दर्यमप्यविकलं महाराष्ट्रस्य साधु प्रतिफलितं लक्ष्यते ।
अत एव खलु गरिमा महिम्नः श्रीगुरुचरित्रस्येति मया निदर्शितमेव
श्रीकामतप्रकाशितश्रीगुरुचरित्रारम्भे समर्पिते 'पुष्पोपहारे' । न च केवल
मेतावता ग्रन्थस्यास्य महाराष्ट्रेण साकं सम्बन्धः शक्यो वर्णयितुम् ।
श्रीगुरुचरित्रं यस्य चरित्रं स श्रीमान् नृसिंहसरस्वतीयतिवरोपि महाराष्ट्र
स्यैतिह्ये किमपि गरीयः स्थानमर्हति । बभूव च तस्य विशिष्टं कार्यम् ।
महाराष्ट्रमहोदयघटनायामेकतः श्रीज्ञानेश्वरनामदेवावपरतश्च श्रीरामदास-
तुकारामावित्यनयोरुभयतोयोगी शृङ्खलः खलु सः । श्रीमदेकनाथस्य स
साक्षात् परमगुरुरासीत् । इदं सर्वं मयाऽनन्तरोक्ते पुष्पोपहारे संक्षेपेण,
श्रीगद्रेमहाशयैश्च स्वीये 'महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग' इत्यभिधे ग्रन्थे
विस्तरेण, प्रतिपादितं भवति । भगवता श्रीज्ञानराजेन वारकरीसम्प्रदायं
प्रतिष्ठाप्य यवनधर्मरूपादाशीविषाद्रक्षिता जनता । तदानीं जनानां मार्ग-
दर्शका ये ब्राम्हणादयो वर्गास्तेभ्यो धैर्यं वितीर्य तेषां स्वकार्यनिष्ठत्वं
श्रीगुरुणा घटितम् । तेषामेव च नेतृणां चरितस्य राष्ट्रे निसर्गतोऽनुवृत्या
यत्तेजः समुद्भूतं तेन श्रीशिवभूपसदृशस्य ज्योतिषः प्रज्वालनं श्रीराम-
दासतुकारामप्रभृतीनां सुशकमभूत् ।

अधुनापि महाराष्ट्रे विशेषतो ब्राह्मणानां नित्यपाठितव्यग्रन्थेषु श्रीगुरु-
समो नान्यो भूयिष्ठप्रचारो ग्रन्थः । साहित्यशास्त्रदृष्ट्यापि तस्य
भूयो महत्त्वम् । यवनमयप्राये भारते सति पूर्णतया विनिर्मुक्त-
शङ्कोयमेक एव महाराष्ट्रभाषायां तदानीन्तनो ग्रन्थः। न ह्यत्र काव्यं
न हठादाकृष्टम्। यत्र च क्वचित् स्वभावतस्तन्निर्झरसलिलमिव स्यन्दते
तदुत्तमकाव्यकक्षामेवारोहति । तस्मिन् यद्भाषाया निसर्गरमणीयत्व
यते तादृशं तदातनेषु विख्यातेष्वपि प्रौढवाङ्मयग्रन्थेषु नैव संलक्ष्य-
क्ते न किमप्यत्युक्तं स्यात् । अयत्नसिद्धो रसपरिपोषोऽस्मिन् नूनं
तं हृदयग्राही । यस्येदं चरितं स भगवान् श्रीनरसिंहयतीश्वरः
तात्रेयस्य साक्षात् विग्रह इति भावुकाः श्रद्दधते । श्रीशैल्ये स्वीयम-
मसमाप्य श्रीगुरुणा केवलं भौतिकं शरीरं गोपितं ततश्च स्वीय-
ण भक्तजनगोचरेण स निरन्तरं जगदुद्धरणकार्यं कुर्वन्नेवास्ते ।
ग्रोपासनया तस्य कृपां सम्पाद्य तस्य साक्षात्कारेण मानवः
ल्याणं साधयितुं पारयतीति साक्षादनुभवविषयोयं भक्तजनस्य ।
र्ं श्रीमदण्णासाहेबपटवर्धनचरणैरिदं सुविस्पष्टं लिखितं भवति यद्

(१) श्रीगुरुरेवैकमखण्डमनन्तं विश्वं नाम । स एव सर्वव्यापकः,
: सर्वसाक्षी, परब्रह्मरूपः परमेश्वरः परमात्मा च । स वेदशास्त्रा-
समुपसेव्यः समुपास्यश्च ।

(२) श्रीभगवान् गजाननो, दत्तात्रेयः, श्रीपादश्रीवल्लभ इति
श्रीनरसिंहसरस्वतीयतिवर एव। स एव च परेशः परमात्मा च।
वतारो भूतले सन्ततं निरन्तरं चास्ते ।

(३) तस्मिन्नवतारसमये यान्यद्भुतकर्माणि कुर्वन् स स्वीयमैश्वर्यं
नस्य प्रकटीचकार तादृशानि सम्प्रत्यपि तस्य सेवया भक्तैरनु-
, स च दयानिधिस्तेषु स्वीयमनुग्रहं वितनोति ।



आसन्नपञ्चशतसंवत्सरात् प्राक् विदर्भेषु पुरा कुबेरनगरीति
सुविख्याते कारञ्जनगरे वाजसनेयशाखाध्यायिनः कौंडिण्यगोत्रोत्पन्नस्य
श्रीमतो ब्राह्मणस्य कुले श्रीगुरुरवतीर्णः। भूयसा भगवदाराधनेन सम्प्राप्तं
सकलशुभलक्षणसंयुतं बालकं संवीक्ष्य मातरपितरौ भूरि ननन्दतुः।
अद्भुतं चेदमभूद् बालकेऽस्मिन् यत्स जातमात्र ओमिति सुगम्भीरं ध्वनि-
मुदीरयामास । ततः परं च स नित्यमेवोङ्कारं जपति स्म । गच्छतानेहसा
तु लक्षितमिदं यत्स ओङ्कारं विहाय नान्यत् किमपि भाषितुं पारयति स्म।
भूरिषु यत्नेषु विफलेषु मूकोऽयं कुमार इति विज्ञाय जनकजनन्यौ
नितरामखिद्येताम् । वयसः सप्तमे वर्षे तु स्वजननीं शोचन्तीमवेक्ष्य 'जाते
मौञ्जीबन्धे वाणी मां प्रतिपत्स्यत ' इति तेन हस्तादिसङ्केतेन सा विज्ञा-
पिता । तस्याश्च विश्वासमुत्पादयितुं कार्ष्णायसशलाकां करतलस्पर्श-
मात्रेण सुवर्णमयीं कारयित्वा स स्वीयमीश्वरत्वं किञ्चिदिव प्रकटयाम्बभूव।
ततो मौञ्जीबन्धेऽनुष्ठिते गायत्रीमन्त्रोपदेशादिषु विधिषु मौनमेवासीद्
बटुवरस्य । मातृदेवतायां तु भिक्षादानाय पुरतः समुपस्थितायां 'वत्स
वेदानुदीरये' ति तदादेशानुसारं सप्तहायनोयं मूकबालकः शास्त्रोदित
विधिना 'अग्निमीळे' इत्यादीर्वेदानां चतुर्णामप्यग्रिमा ऋचः सुविस्पष्टं
समुदैरयत्। अनन्तरमेव च प्रार्थिता स्वजननी 'भिक्षाटनाय भवत्यादिष्टो-
ऽहम् । तदधुनाऽऽजीवनं ब्रह्मचर्यधारणाय तीर्थाटनाय चानुज्ञा मे दीयता-
मि'ति । स्वभावादेव शोकाकुलया जनन्या स प्रतिवारितस्तथा चैकावर-
स्यापरस्य पुत्रस्य जन्मनः प्राङ् न गन्तव्यं त्वयेति सानुबन्धमादिष्टम् ।
तदा किमेकेन, तव पुत्रद्वयसम्भवात् प्राङ् नाहं यास्यामीति ससन्तोषं
प्रतिश्रुत्य श्रीगुरुस्तत्रैव कंचित् कालं वसति स्म । अध्यापनोपदेशाभ्यां

च कारंजानगरवासिनः पावयति स्म । कतिपयदिवसानन्तरमेव माता गर्भमाधत्त यथाकालं च यमलं प्रसूतवती । तदा पुनरेकविंशत्या संवत्सरैः पुनरागमिष्यामीति समाश्वास्य महता कष्टेन मातुरनुज्ञां लब्ध्वा श्रीगुरुः काशीक्षेत्रमुपागमत् । तत्रैव वसते तस्मै श्रीमच्छङ्करभगवतः शृङ्गेरी-मठशिष्यपरम्परान्तर्गतो वृद्धस्तपस्वी कृष्णसरस्वती नाम यतिवरः संन्यासदीक्षां दिदेश । ततो बदरीवनं गत्वा स्वीयावतारकार्यस्यावश्यकं पूर्वोपकरणभूतं योगादिसाधनानां प्रात्यक्षिकमनुष्ठानं श्रीगुरुणा विहितं लोकाचारमनुसृत्य । ततश्च विविधानि तीर्थान्यटन्, आर्तानां साहाय्यं वितरन्, भक्तजनं समुद्धरन्, प्राकृतजनं धर्मपथं प्रापयन्, शरणागताननुगृह्य तेभ्यश्च यथोचितं संन्यासादिदीक्षाः प्रदाय शिष्यमण्डलं वर्धयन्, स्वसान्निध्यं प्राप्तांश्च सर्वानपि तत्तत्सामर्थ्यानुसारं तपसि प्रवर्तयन्नेकविंशत्या वर्षैः पुनरपि स्वजन्मभूमिं प्रतिन्यवर्तत । तत्र कञ्चित् कालमुषित्वा पुनरपि दक्षिणभारतयात्रायै सम्प्रतस्थे । रत्नाबाईनाम्नी कनीयसी स्वभगिनी तपस्यार्थमनुज्ञां याचमाना 'पतिसेवैव परमा तपस्या पुरन्ध्रीणा—मि'ति तेनोपदिष्टा । आगामिनि काले पतिवियोग-श्वेतकुष्ठादयःकुयोगास्ते भविष्यन्ति । अतः समुत्पन्ने श्वेतकुष्ठे गाणगापुरीं प्रति त्वया गन्तव्यमिति सादिष्टा । गोदावरीतटयात्रायां दुःसहेनोदरशूलेन पेपीड्यमानं व्यथापनयनाय च मुमूर्षुं कंचन ब्राह्मणमाकण्ठं भोजयित्वैव स नीरोगं चकार । तदानीं च यस्य गृहे भिक्षा स्वीकृता तं सायन्देवाभिधं द्विजमनुगृह्य तस्य यवनभयं दूरीकृतम् । सायन्देवस्य स्वामी कश्चन यवनोभूत स च किल ब्राह्मणानां परमद्वेष्टेति विश्रुतमासीत् । श्रीगुरोस्तु कृपया तस्यैव चेतसि भयमुत्पन्नं स एव च सायंदेवं शरणं ययौ । एवं 'पाठी



असता तो जगजेठी । वरकड काय गुमान' (पृष्ठे सति जगदीशे तस्मिन्नितरत् किमिह बलम्) इति साक्षात् स्वीयालौकिकसामर्थ्यस्य प्रत्ययं लोकस्य दत्त्वा पुनरपि पञ्चदशभिर्हायनैस्त्वां गाणगपुर्यां द्रक्ष्याम इति सायंदेवाय प्रतिश्रुतवान् । ततस्तासग्रामोपकण्ठेऽर्वाचीनौदुम्बरक्षेत्रे श्रीभुवनेश्वर्याः पुरातनं स्थानमासीत् । तत्र मासचतुष्टयमुषित्वा नरसोबावाडीक्षेत्रं प्राप । तदानीमेष प्रदेशः शिरोळमर्यादायामन्तर्भूतः । तत्रौदुम्बरतले द्वादश वर्षाणि निवासं कृत्वा, तत्र स्वपादुके स्थापयित्वा, स्थानाय चास्मै वरं वितीर्य स गाणगापुरीं प्रापत् । तत्र नानाविधा अद्भुतलीला विधायासंख्यजनान् सन्मार्गं नयन् बेदराधिपतेर्यवनस्य दुःसाध्यं स्फोटकं कृपाकटाक्षेण निरस्य, तस्य पूर्वजन्मस्मरणं कारयित्वा श्रीशैल्यपर्वते स स्वीयं स्थूलविग्रहं गोपयामास ।

गाणगापुर्यां श्रीगुरुणा वन्ध्यमहिषीदोहनं, वृद्धवन्ध्यायै संततिदानं, मृतस्य पुनरुज्जीवनं, शुष्ककाष्ठे पल्लवनिर्माणं, 'पथा गच्छन्तं मातङ्गमाहूय तन्मुखेन पण्डितम्मन्यानां ब्राह्मणानां दर्पापहरणमित्यादयः परमाद्भुता लीलाश्चक्रिरे । एता हि मानवसामर्थ्यमतिक्रान्ताः । अत एव आधुनिका नव्याः शुष्कबुद्धिवादरतास्तर्केणैव जगज्जिगीषवः प्रायेणैता लीलाः परमार्थतो घटिता न वा, तासां शक्यतैव स्यान्नवेत्यपि च ख्रैस्ताब्दानां विंशशतके समुपचीयमानविज्ञाननिकषे स्वीयां शङ्कां प्रकटयेयुः । तेषां समाधानस्य नायमवसरो न चाप्यवकाशो लघीयसि प्रबन्धेस्मिन् । ऐतिह्यशास्त्रस्याध्येतारश्च नास्मिन् विषये याथातथ्यं मृगयन्ते । "इमे चमत्काराः शक्यरूपा न वेति नैव विचारणीयं नाम । इमे शक्यरूपा इति तदानींतनाः श्रद्धापूर्वम् अमंसत न वेति खलु मीमांसाविषय ऐतिह्यविदाम्" इति

फर्ग्युसनविद्यामन्दिरस्य प्राध्यापकैः श्रीशर्मामहोदयैरुक्तं तत्खलु
हृदयंगमम् । * न च तदानींतनानामेवैषा श्रद्धा, अपि तु सम्प्रत्यपि
कोट्यवधिसंख्याः श्रद्दधते यदिमे चमत्काराः शक्यास्तथा च ते
श्रीगुरुणा कृता इति । श्रीगाणगापुरक्षेत्रं, तत्र च प्रतिवर्षं संमिलन्तोऽ-
सङ्ख्या यात्रिका एवास्य निदर्शनं नाम । इमे तु चमत्काराः श्रीगुरो-
रानुषाङ्गिकी लीलैव । श्रीगुरोः पारमार्थिकमुद्दिष्टं नाम महाराष्ट्रीयस्य
महाराष्ट्रधर्मे प्रतिष्ठापनं, तस्य स्वाभिमानं प्रज्वाल्य तस्य हृदये सदाशा-
समुद्दीपनं, परमेश्वरः साहाय्यकृदिति तस्य चेतसि विश्रम्भमुत्पाद्य तस्य
धैर्यपराक्रमयोश्चेतनं तथा च यवनाक्रमणात् सर्वत्र दृश्यमानां प्रज्ञाहततां
दैन्यं च समुद्धूय महाराष्ट्रस्य संजीवनं, सद्गुणवर्धनेन उत्तममानवत्व-
प्रापणाय महाराष्ट्रीयस्योद्धरणामिति च । तथा चादिष्टः सायन्देवस्तेन
'स्थातव्यं चेन्मया सार्धं म्लेच्छो वन्द्यो न कर्हिचिद्' + इति । एत-
स्येङ्गितं श्रीगुरोरुपासकैरवश्यं चिन्तनीयम् ।

तत आरभ्याद्ययावत् गाणगापुरीमाहात्म्यं श्रीगुरोरुपासना च
निरन्तरं संवर्धमाने संलक्ष्ये । उपासनाप्रकारेषु मानसपूजा नाम भवति
विशिष्टः प्रकारः । तादृशं च तस्य महत्त्वमपि । श्रीरामदासचरणैरादेश
एव दत्तः शिष्यजनस्य मानसपूजा नित्यनियम इत्यवश्यमनुष्ठेयेति ।

* The fact for the historian is not that according to him miracles did take place, but that the people sincerely believed that they did happen.
"Maratha History Reexamined" Page. 92

\+ जरी आम्हापाशी राहशी । तरी त्वां न वंदिजे म्लेंच्छाशी ॥ श्रीगुरुचरित्र



अस्यादेशस्य शास्त्रीयं तथा राष्ट्रियमपि भवति वैशिष्ट्यम् । भावयोगस्य
परमावश्यकमङ्गं मानसपूजा नाम । ध्यानसिद्धये करणभूता श्रेणी खलु
सा । राष्ट्रस्य वैभवमैश्वर्यं च साक्षाद् परमोपचयं नेतुं सोपकुरुते । अयं
विषयः 'स्वानन्दसाम्राज्य' नामके ग्रन्थे श्रीरामरावकृष्णजठारमहोदयैः
साधूपपादितः । अयं हि महिमा ध्यानयोगस्य यत्तत्र कृतः संकल्पः
स्थूलरूपेण बाह्यजगति प्रकटीभवति ....कालान्तरेण । संसिद्धायां मानस-
पूजायां ध्यानाध्ययनमार्गे पदं निदधानानां भवत्यनुभवो यत्तत्र समुत्प-
न्नानां सूक्ष्मविषयाणां प्रतीतिर्बाह्यजगति सर्वेषामितरेषामपि सुशका ।
मानसपूजायामनन्तपुष्पमर्पितं चेत्समीपस्थानामपि सुलभं भवति तत्सौ-
रभम् । आश्चर्यं खल्विदं विशेषेण विदर्भनागपुरादिस्थलेषु यत्रानन्तपुष्पं
द्रष्टुमप्यसुलभम् । संसिद्धौ ध्यानस्य मनसा कल्पितमितरदपि वस्तुजातं
दृश्यरूपं धारयति । मनसा चानुष्ठेयायां पूजायां किं दुर्भिक्षं नाम ?
को वा प्रत्यवायः ? उक्तं हि श्रीसमर्थरामदासस्वामिभिः 'मनाचेथे
काय दुष्काळ' (मनः किं तत्र दुर्लभम् ) इति । महामहतामपि सम्राजां
दुर्लभं वस्तु येनकेनापि मनसा कल्पयितुं सुशकम् । तथैव समृद्धं राज्यं
च वस्तु कल्पनीयं नाम । न तत्र कार्पण्यं कदापि प्रकटनीयम् ।
तथा कृते कल्पतरुतले भिक्षाचिन्तनमिव तत् स्यात् । निदर्शितं हि
श्रीमदाचार्यपादैः 'रत्नैः कल्पितमासनम्' इत्यादिना मानसपूजाविधानस्य
वर्त्म । सर्वत्र मानसपूजाप्रचारे जाते स्वभावत एव बहवा ध्यानसिद्धा
उपलभ्यन्ते येषां ध्यानगतं सकलमैश्वर्यं समृद्धिमद्वस्तुजातं च राष्ट्रे
साक्षादाविर्भवति । इयं नः शास्त्राणां प्रतीतिरस्मिन् विषये ।

श्रीगुरोरुपासकानां मानसपूजापद्धतिः सुविदिता स्यात् तस्याश्च साक्षादनुष्ठानं सुकरं भवेदिति बुद्ध्या श्रीचरणस्य भक्तः कश्चन गोपालकविः स्तोत्रमेकमरीरचत् । कोऽयं गोपालकविः स्वजन्मना च कं देशमलंचकारेति न कस्यापि विदितं न च संशोधनेनापि 'तेषां कस्मिन् कुले जन्म । वसतिः कुत्र वा स्थले' इति मार्गणममफलमेव प्रायशः स्यात् । किं वामुना संशोधनेन प्रयोजनं नाम । यःकोऽपि स भवतु । नरकेसरीनाम्ना कविना श्रीगुरुमानसपूजाविधानं सुव्यक्तं कृतमिति श्रीगुरु-चरित्रस्य षट्चत्वारिंशेऽध्याये वर्णितमस्ति । मन्ये स एवाऽयं केसर्युपनामा गोपालकविः । न चायमप्रसन्नस्तर्कः । यतो विद्यतेऽद्यापि श्रीमदलकापुर्यां केसर्युपनामकं द्विजकुलं श्रीज्ञानेश्वरचरणसेवापरायणम् । स्तोत्रमिदं तस्य भक्तिरसपरिप्लुतमन्तरङ्गमाविष्करोति । श्रीगुरोर्निरपेक्षं पर्युपासनमिति कृत्वा तेनेदममृतं भावुकानां पुरतो निहितम् । यदसौ पूर्णतया लोकस्तुतिनिरपेक्षस्तदेवास्य महिमानं हृदयस्य द्योतयति । इमां मानसपूजामनुष्ठाय भक्तजनैः कृतार्थैर्भवितव्यमित्येतावती तदीयाऽऽकाङ्क्षा । तावन्तमानन्दं तस्यान्तरात्मने वितीर्य तस्य ऋणं प्रतिदेयमिति श्रीगुरुभक्तानामग्रिमं कर्तव्यं नाम । अस्ति श्रीमदाचार्यपादानां 'चतुःषष्ट्युपचारं मानसपूजास्तोत्रम्' श्रीजगदम्बिकामुद्दिश्य विरचितम् । तदनुरोधेनैव गोपालकविनेदं विरचितं स्यादिति प्रथमश्लोकादेवोन्नेतुं शक्यम् ।

'उषसि मागधमङ्गलगायनैर्झटिति जागृहि जागृहि जागृहि ।
अतिकृपार्द्रकटाक्षनिरीक्षणैर्जगदिदं जगदम्ब सुखीकुरु ।'

इति श्रीमदाचार्याणां श्लोकेन सार्धं



'श्रीमन्नमोऽस्तु नरसिंहसरस्वतीश । गीतैः शुभैर्झटिति जागृहि पाठकानाम् ।
कारुण्यपूरितकटाक्षदृशां प्रसारैरेतज्जगत्सुखय भानुरुदेष्यतीतः ॥'

इति गोपालकवेः श्लोके पठितेऽनन्तरोक्तस्य सत्यत्वं प्रतीयेत । इदमपि तदिव नितान्तमधुरम् । उत्तमकाव्यस्य सर्वे गुणा अस्मिन्नवस्थिताः । प्रसादो, माधुरी, सरलता, वृत्तवैचित्र्यमित्यादि सकलं चेतोहारि काव्यान्तरङ्गमस्मिन् सुसम्पन्नम् । अस्य नित्यपठनेन, तस्य साहाय्येन च मानसपूजाभ्यासो विधीयते चेत्साधकानां भूयाननुग्रहो भवेदिति धिया मन्दारकल्पा अस्मत्सुहृद्वराः श्रीमन्दार-भास्कर-जोशीमहोदयाः स्तोत्रमेतत्प्रकाशयितुं कृतसङ्कल्पाः । तेभ्यश्चासंशयं भावुका अनेकशो धन्यवादान् वितरीष्यन्ति । स्वसङ्कल्पमशून्यं कर्तुं तैर्ये कृताः परिश्रमास्तेऽपि भूरि प्रशंसामर्हन्ति । सर्वेषां श्लोकानां महाराष्ट्रभाषायामनुवादं विधाय दुरवबोधसंस्कृतशब्दानां झटिति बोधाय तैरत्र टिप्पण्योऽपि संगृहीताः । अत्र काव्ये गोस्तनादिवत् सामान्यतोऽपरिचिताः शब्दा नूनं टिप्पणीं विना दुर्बोधाः स्युः । एवं च सर्वथा साधकानां भूयिष्ठ उपकारो भवेदिति बुद्ध्या योऽयं सङ्कल्पः श्रीजोशीमहोदयानां स्तोत्रप्रकाशनस्य स खलु सादरमभिनन्दनीयः । इयं च तदीया परिचर्या श्रीगुरोः संमता भवतु, भक्तजनस्य चानया भूयानुपकारः संजायतामित्येषा खलु श्रीगुरुपादुकयोर्मदीया सुनम्राभ्यर्थना । इति शम् ।

श्रीगुरुचरणकिंकरपरंपराश्रयपरिपूतः

अप्रबुद्धः

श्रीगणेशाय नमः । श्रीदत्तात्रेयाय नमः ।

ॐ श्रीमद्विश्वम्भरामण्डलमण्डनायमानानूननिजसत्कथागगनगङ्गा-पवित्रीकृतभुवनसन्दोहः, निःशेषदूरीकृतभक्तजनमनःसन्देहः, नानोपाधि-निमित्तानिर्वचनीयाऽऽवरणविक्षेपशक्तिद्वयात्मिकाविद्यासादितकर्मत्रयरूप-बीजव्रजज्ञानानलभर्जनानङ्कुरितसंसारवृक्षः, निरन्तरावलम्बिततितिक्षः, अज्ञानगाढान्धकारदर्शनिशायमानमूढाज्ञजनधिषणादिनकरोदयायितनिजद-यासारः, अनवरतकृष्णातटिनीतटकृतलीलाविहारः, स्वयम्भूरिववाणीविला-सभूतवदनः, पुण्डरीकाक्ष इव करधृतशङ्खचक्रः, खण्डपरशुरिवाङ्गीकृतवृष-भध्वजः, पुरन्दर इव विबुधपालनाभिरतः, पारावार इव निरवधिकघन-रसस्वरूपः, सुधांशुरिव सकललोकाप्यायनकरः, दिनकर इव निखिललोक-बान्धवः, धन्वन्तरिरिव दुर्भवरोगनिवारणकरणधुरीणः, वसंत इव सकल-सुमनोनिकुरम्बसमाश्रयः, परशुराम इव विरोधिनिरासविधानविशारदः, श्रीराम इव शरणागतवत्सलः, इत्याद्यनेकगुणगणमणि-रत्ने तास्विनीन्द्रः, श्रीनरसिंहसरस्वतीयोगिचन्द्रः, पद्मपताकाङ्कुशाद्यनेकशुभलक्षणलक्षितै-रात्मीयचरणारविन्दविन्यासैर्वसुमतीं धन्यां कुर्वन् भक्तजनसन्तारणाय सर्वत्र स्वेच्छया कृतसञ्चारः, पतिव्रतामृतपतिसञ्जीवनादिजगदद्भुतचरितैरखिलान् विस्मापयन् विचचारेति पौराणिककथामाकर्ण्यासञ्जातकुतूहलो गोपालकविः श्रीदत्तात्रेयप्रत्यवतारं तं साक्षादीश्वरं मत्वा स्वस्य श्रेयोभिकाङ्क्षिणान्तर-ङ्गेण भक्तजनोपकाराय च मुक्तिसाधनेषु मानसपूजां वरिष्ठां विज्ञाय तथा तस्य भगवतः कृपां संपिपादयिषुस्तां विरचयति श्रीपाद ॐ ।



## अथ श्रीमन्नृसिंहसरस्वतीमानसपूजाप्रारम्भः ।

श्रीमन् नमोऽस्तु नरसिंहसरस्वतीश ।
गीतैः शुभैर्झटिति जागृहि पाठकानाम् ॥
कारुण्यपूरितकटाक्षदृशां प्रसारै- ।
रेतज्जगत्सुखय भानुरुदेष्यतीतः ॥ १ ॥

आवाहयामि भगवन्तममेयमर्च्यम् ।
कौतूहलेन नरसिंहसरस्वतीशम् ॥
योऽयं निरक्षरमुखेन मुदा समग्र- ।
वेदानपाठयदचिन्त्यमहानुभावः ॥ २ ॥

योगिन् कटस्खलदमंदमदाम्बुलुभ्य- ।
द्रोलम्बमुज्ज्वलचतूरदनाभिरामम् ॥
आरुह्य निस्तुलकुथास्तृतपृष्ठभागम् ।
नागं मदीयभवनं प्रविशादरेण ॥ ३ ॥

सौवर्णोन्नतवेदिकाविलसितं तुङ्गध्वजोल्लासितम् ।
नानालंकृतिरंगवल्लिरचनाचक्षुःप्रमोदप्रदम् ॥
मुक्ताजालविभूषितान्तरयुतं गाङ्गेयकुम्भोज्ज्वलम् ।
लीलायोग्यमिदं मनोज्ञभवनं योगिन्नहं तेऽर्पये ॥ ४ ॥

नवपल्लवपुष्पसन्तते । परया तूलिकया विराजिते ॥
महनीयविभासमन्विते । भगवन्नत्र निषीद पीठके ॥ ५ ॥

सरसिजकरवीरैः[1] कुन्दमन्दारमल्ली[2]- ।
बकुलमुकुलतान्तैः संयुतं दिव्यगन्धैः ॥

---

१ करवीर–कण्हेर. २ मल्ली–मोगरा.

मृगमदघनसारामोदसम्मोदनीयै-।
र्यतिकुलवर पाद्यं पादयोस्तेऽर्पयामि ॥ ६ ॥

दिव्यप्रसूनोत्करगन्धगन्धिलै-।
र्गङ्गादिसत्तीर्थसमाहृतैर्जलैः ॥
सुगन्धपुष्पाक्षतसङ्गशालिभि-।
र्ददामि तेऽर्घ्यं नरसिंह सादरम् ॥ ७ ॥

घनसार[1]सुगन्धबन्धुरम् । नवकंकोल[2]सुवासनान्वितम् ॥
नरसिंहसरस्वति प्रभो । जलमङ्गाचमनाय तेऽर्पये ॥ ८ ॥

युक्तं चलन्मौक्तिकमञ्जरीभी ।
रत्नोन्नतस्तम्भशिखावलम्बम् ॥
उल्लोचनं[3] ते नरसिंह योगिन् ।
यच्छेम नः प्रीतिकरं महार्हम् ॥ ९ ॥

मधुदधिगुडदुग्धैः सर्पिषा चाभियुक्तम् ।
यतिवर मधुपर्कं श्रीनृसिंहाख्य योगिन् ॥
अनवहितमतिस्ते भक्तियुक्तोऽर्पयेऽहम् ।
मयि वितर कटाक्षान् नित्यकारुण्यपूर्णान् ॥१०॥

स्नानं मलापकर्षणपूर्वं तुभ्यं विधाय योगीन्द्र ।
दधि-मधु-पयः-सिताज्यैः पंचामृतमज्जनं मुदा कुर्वे ॥११॥

गङ्गादितीर्थाहृतनीरपूरैः ।
कर्पूरसौरभ्ययुतैर्मनोज्ञैः ॥
शुद्धोदकस्नानमतिप्रहृष्टः ।
स्वामिंस्तदङ्गीकुरु योगिवर्य ॥१२॥

---

१ घनसार-कापूर. २ कंकोल-गवला. ३ उल्लोचन-छत्र, मंडपी.



शरदिन्दुसमानकान्तिभाजा ।
विमलेनोत्तमवाससातिभक्त्या ॥
भवदार्द्रतनोः प्रहृष्टचेताः ।
प्रियमुद्वर्तनमाचरामि योगिन् ॥१३॥

मणिकांचनरञ्जितयोर्नवपादुकयोः पुरो निवेशितयोः ।
चरणौ निधेहि कृपया नरसिंहसरस्वतीश हृष्टात्मा ॥१४॥

दरहारतुषारहीरभासा शुचिना पाण्डुरभस्मना तवाङ्गम् ।
निखिलार्तिनिवारकेण योगिन् करुणाभूषण भूषयातिहृष्टः ॥१५॥

बन्धूकोज्ज्वलकान्तिकान्तममलं काषायभूषान्वितम् ।
श्लक्ष्णैर्दन्तुरतन्तुभिर्विरचितं मुक्तानुषक्ताञ्चलम् ॥
चित्तानन्दकरं परं शुचितमं चैलं प्रयच्छे मुदा ।
स्वामिन् श्रीनरसिंह-योगि-तिलक प्रीत्या त्वमङ्गीकुरु ॥१६॥

अरुणिमरुचिहृद्यं स्वांसयोर्धारणीयम् ।
कनकगुणवितानै[1] रञ्जितं मञ्जुलाभम् ॥
असममसमगन्धैरुत्तरीयं गृहाण ।
प्रणयभरित कृष्णातीरसंचारशील ॥ १७ ॥

श्रीमन्नृसिंहाभिमतप्रसूनमालाभिरङ्गं तव भासमानम् ।
दयानिधे दण्डकमण्डलुभ्यां शंखेन चक्रेण विभूषयामि ॥१८॥

चन्दनेन सुरभिद्रवभाजा । पङ्कजोज्ज्वलरजोमिलितेन ॥
योगिराज भवदीयललाटे । सन्दधामि तिलकं कुतुकेन ॥१९॥

कर्पूरसौरभ्यसमन्वितेन । श्रीखण्डगन्धद्रवसंयुतेन ॥
दिव्याङ्गरागेण तनुं त्वदीयाम् । विलेपये श्रीनरसिंहयोगिन् ॥२०॥

---

१ वितान-विस्तार.

शरदिन्दुकलाविभासमानान् । हृदयप्रीतिकरान् शुभस्वरूपान् ॥
प्रणयेन कृपानिधेऽर्पये ते। कृपयाङ्गीकुरु सम्यगक्षतांस्त्वम् ॥२१॥

अशोक-चाम्पेय-सरोज-मल्ली-वासंतिका[1]-पाटल-बन्धुजीवैः[2] ॥
दिव्यप्रसूनैस्तुलसीदलैस्त्वां समर्चयेऽहं नरसिंहयोगिन् ॥२२॥

नव्यगुग्गुलसमुद्भवमर्हं कापिलाज्य[3]जनितं नरसिंह ।
स्वीकुरुष्व कृपयागरुजन्यं घ्राणतर्पणकरं बत धूपम् ॥२३॥

सिक्तेन गोजन्यघृतेन योगिन् । वर्तित्रयेणाभियुतं मनोज्ञम् ॥
मोहान्धकाराभिहतिप्रवीणम् । दीपं गृहाण प्रणयेन योगिन् ॥२४॥

हिङ्गूजीरकशृङ्गवेर[4]मिलितैः शाकैर्मनोहारिभिः ।
सूपैः पायस-पर्पटप्रभृतिभिर्हृद्योपदंशैर्नवैः ॥
नानाभक्ष्यचयैः पयोदधिघृतक्षौद्रैः फलैर्गोस्तना[5]-
रम्भाम्रादिसमुद्भवैर्यतिपते शाल्यन्नमङ्गीकुरु ॥२५॥

बहुभिश्चषकैः[6] क्वथिका[7]सर्पिर्मुखपूरितैः परितः ।
पूर्वापोशनपूर्वं काञ्चनपात्रे गृहाण नैवेद्यम् ॥२६॥

मध्ये मध्ये सलिलं गन्धिलमतिशीतलं स्वादु ।
स्वीकुरु नृसिंह योगिन् काञ्चनपात्रास्थितं मया दत्तम् ॥२७॥

श्रीमन् नमस्तेऽस्तु नृसिंह योगिन् ।
भुक्त्वा यथेष्टं सरसान्नमेतत् ॥
हृष्टान्तरात्मा सलिलैरमीभिः ।
कुरूत्तरापोशनमर्हकृत्यम् ॥२८॥

---

१ वासन्तिका–मधुमाधवी, मधुमालती. २ बन्धुजीव–दुपारी नांवाचें फूल. ३ कपिला–रेणुकबीज नांवाचे सुगंधी द्रव्य किंवा कपिला गाय. ४ शृङ्गवेर–आलें. ५ गोस्तना–गोस्तनी–द्राक्ष. ६ चषक–पानपात्र, वाटी. ७ क्वथिका–कढी.



कोष्णैस्तीर्थानीतैः कर्पूरामोदमेदुरैः सलिलैः ।
वदनं कराब्जयुगुलं योगिन् प्रक्षालय प्रमोदात् त्वम् ॥२९॥

एभिर्मनोज्ञसलिलैर्वियदापगायाः ।
कर्पूरगन्धमिलितैः शुचिभिः सुशीतैः ॥
आचम्यतामयि विभो नरसिंह योगिन् ।
हृष्टाशयो मयि विधेहि कृपाकटाक्षान् ॥३०॥

तप्तकाञ्चनविलासभासुरैः । संयुतां मृदुदलैः सखादिराम्[1] ।
पूगखण्डमिलितां कृपानिधे । वीटिकां वृणु सुगन्धबन्धुराम् ॥३१॥

रत्नकाञ्चनमये नवपात्रे । गोघृताभियुतवर्तिनिविष्टैः ।
देव दीपनिवहैः कलये ते । मङ्गलार्तिकमिदं वृणु योगिन् ॥३२॥

कर्पूरनीराजनमर्पये ते । गृहाण योगिन् कृपया महार्हम् ।
मदीयचेतोनिबिडान्धकारम् । नृसिंह दूरीकुरु निष्प्ररोहम् ॥३३॥

रथाङ्गपद्माङ्कुशवज्रशङ्खध्वजादिदिव्याङ्कविभासमाने ।
पदद्वये ते नरसिंह योगिन् । अर्घ्यं प्रयच्छे पुनरादरेण ॥३४॥

भुवि जानुद्वयं न्यस्य पात्रं नीराजनस्य तद् ।
वहन् मूर्ध्नि त्वदास्यांके त्रिवारं भ्रामये यते ॥३५॥

मन्दारमल्लीकरवीरकुन्दपुन्नागजाती[2]बकुलारविन्दैः ॥
बैल्वैर्दलैश्चित्तहरैश्च तुभ्यं पुष्पाञ्जलिं योगिवर प्रयच्छे ॥३६॥

अभिनवमणिजालैर्मौक्तिकैः स्वर्णपुष्पैः ।
प्रणयमधुरवाग्भिः संविकीर्याभिपूज्य ॥
कनक-मणि-गणांस्ते दक्षिणायै प्रयच्छे ।
यतितिलक कृपालो श्रीनृसिंहाख्य योगिन् ॥३७॥

---

१ खादिर–काथ. २ जाती–चमेली.

उद्यत्सुधांशुवलयप्रतिमानमेतन्मुक्ताफलस्तवकगुम्फित-
शोभिताग्रम् ।
दिव्यार्हदण्डकलितं नरसिंह योगिन् छत्रं करेण तव मूर्धनि
धारयेऽहम् ॥३८॥

दिव्यकाञ्चनविभासितदण्डैर्नूतनमौक्तिकततिस्फुरिताग्रैः ।
हारहीरतुहिनांशुसमाभैश्चामरैर्यतिपते कलये त्वाम् ॥३९॥

रुचिरांशुदर्शनीये विमलतरे दर्पणे निजां मूर्तिम् ।
अवलोकय महिताभां नरसिंह-सरस्वति प्रभो प्रीत्या ॥४०॥

कनककलशशुंभत्कुम्भसंभासिताग्रम् ।
महितहयचतुष्कं प्रेक्ष्यशोभाभिरामम् ॥
श्रुतिसुखनिनदाश्वात्किङ्किणीजालरम्यम् ।
यतिकुलवर हर्षादर्पये ते शताङ्गम्[1] ॥४१॥

चटुलतुरगमाद्यद्दन्तिसन्तानरम्यम् ।
रथनिकरपदातिव्रात[2]सञ्चारचारु ॥
यतिवर चतुरङ्गं सैन्यमेतत् कृपालो ।
प्रमुदितहृदयस्त्वं मत्प्रणीतं गृहाण ॥४२॥

चातुर्यधुर्यनटनोत्सवदर्शनीया ।
संसद्विकीर्णकुसुमाभ नृसिंह योगिन् ॥
सौन्दर्यभूमिरसमानवयोविलासा ।
हर्षाय ते भवतु चित्रपटी नटीयम् ॥४३॥

ततथेय्यतथेय्यथोंगथोंगेत्यनुनाद्यस्फुटतालवादिशब्दः ।
नरसिंहसरस्वतीश भूयात्तव हर्षाय मनोविनोदकारी ॥४४॥

१ शतांग–रथ. २ व्रात–समूह.



भेरिका[1]पणव[2]झल्लरी[3]मुखप्रौढवाद्यनिनदो मनोहरः ।
चेतसस्तव मुदं तनोत्वसौ श्रीनृसिंह यतिवर्य सादरम् ॥४५॥

नाहं सहस्रवदनो न च षण्मुखो वा ।
नैवास्मि पंचवदनो न चतुर्मुखोऽपि ॥
निःसीमतावकगुणोत्तरकीर्तनेऽहम् ।
शक्तः कुतो मृतमहीसुरजीवनाढ्य ॥४६॥

पदे पदे येन शताश्वमेधजं फलं महाधेनुसमर्पणोद्भवम् ।
नृसिंह योगिन्नयि तत् प्रदक्षिणं पुनःपुनस्ते करवाणि भक्तितः॥४७॥

विज्ञानामृतसेवनप्रणयिनं विश्वोन्नतप्राभवम् ।
विद्या-निर्गलितान्धकारपटलं विद्वज्जनानन्दिनम् ॥
विख्यातोज्ज्वलकीर्तिभासुरतरं विश्वासि-चिन्तामणिम् ।
विश्रान्त्यै मनसो भजे विनयतो वेद्यं नृसिंहं गुरुम् ॥४८॥

अनेकभवसंचितप्रकटितोरुदोषावली ।
महानिगडबन्धनाद्गलितबोधशश्वान्निधिः ॥
असारतरसंसृतिक्रमपयोधिमग्नो ह्यहम् ।
नृसिंह यतिवर्य मां प्रणयपूर्णदृष्ट्योद्धर ॥४९॥

अभिनवमणिसौधे कल्पिते पुष्पजालै-।
र्मृदुतरवरचैलैश्छादिते दिव्यतल्पे ॥
विलसितमणिदीपैर्दीपिते सोपधाने ।
स्थितमनुपमबोधं भावये श्रीनृसिंहम् ॥५०॥

रहसि निजपरैक्यज्ञाननिष्ठागरिष्ठः ।
स्वचिदनुभवयोगान्निर्भरानन्दपूर्णः ॥

१ भेरिका–दुन्दुभि २ पणव–मृदंग. ३ झल्लरी–हुडुक नांवाचे वाद्य.

हृदयकमलमध्ये संस्मरन् सेवकं माम् ।
कुरु सुखशयनं भोः श्रीनृसिंहाख्य योगिन् ॥५१॥

श्रीमन्नृसिंहयमिनोऽपचितिर्मनोज्ञा ।
गोपालसूरिरचिता मनसा विधेया ॥
मोहान्धकारहरणप्रवणानुभावा ।
श्रेयस्तनोतु सततं पठतां जनानाम् ॥५२॥

ॐ तत्सत् । इति श्रीमन्नृसिंहसरस्वतीमानसपूजा समाप्ता ।



शान्ताकारं शिखरशयनं नीलकण्ठं सुरेशम् ।
विश्वाधारं स्फटिकसदृशं शुभ्रवर्णं शुभाङ्गम् ॥
गौरीकान्तं त्रितयनयनं योगिभिर्ध्यानगम्यम् ।
वन्दे शम्भुं भवभयहरं सर्वलोकैकनाथम् ॥

---



श्री समर्थांना ज्या महाराष्ट्राचे 'आनंद-वन-भुवन' झालेलें दिसलें, त्या महाराष्ट्राचा 'श्रीगुरुचरित्र' हा राष्ट्रीय ग्रंथ आहे. श्रीमत् दासबोध, ज्ञानेश्वरी, इत्यादि ग्रंथ हेहि राष्ट्रीयच आहेत; परंतु त्या ग्रंथांत महाराष्ट्रीय जनतेचे अगदी खोलांतलें खोल असे हृद्गत जरी प्रतिबिंबित झालें असलें तरी संपूर्ण महाराष्ट्राचे चित्र कांही उमटलेलें नाही. तशी श्रीगुरुचरित्र ह्या ग्रंथाची गोष्ट नाही. त्यांत हृद्गत तर उमटलेलें आहेच, परंतु त्याचे मूर्तिसौंदर्यहि प्रतिबिंबित झालें आहे. म्हणून त्या काळच्या वाङ्मयांत श्रीगुरुचरित्राची योग्यता फार मोठी समजली पाहिजे हे, मी श्री. कामत ह्यांच्या श्रीगुरु चरित्रास जो 'पुष्पोपहार' अर्पण केला आहे, त्यांत दाखविलें आहे. महाराष्ट्राचे मूर्तिसौंदर्य व हृद्गत प्रतिबिंबित झालें आहे, एवढाच त्याचा व महाराष्ट्राचा संबंध नाही. श्रीगुरुचरित्राचे नायक जे श्रीनरसिंहसरस्वती त्यांचे महाराष्ट्राच्या इतिहासांत कांही विशेष महत्वाचे कार्य व स्थान आहे. महाराष्ट्रमहोदयाच्या घडणींतील श्री ज्ञानेश्वर, नामदेव, आणि श्रीसमर्थ, तुकाराम ह्या दोन आदिअंताच्या मधला तो दुवा आहे. श्रीएकनाथ महाराजांचे तर ते आजेगुरुच होते, इत्यादि विषय श्री. गद्रे यांनी आपल्या "महाराष्ट्र-महोदयाचा पूर्वरंग" या इतिहास-ग्रंथांत विशेषतः व उपरोक्त लेखांत आपाततः, मी मांडला आहे. श्रीज्ञानेश्वरांनी वारकरी सांप्रदायाची स्थापना करून जनतेला प्रत्यक्ष इस्लामच्या भक्ष्यस्थानीं पडूं दिलें नाही. त्यावेळचे जनतेचे जे पुढारी, म्हणजे विशेषतः ब्राम्हण किंवा वरचे वर्ग, त्यांना धैर्य देऊन कर्तव्यतत्पर करण्याचें कार्य श्रीगुरूंनी केलें; व त्याच पुढाऱ्यांचे अनुकरण, जनतेच्या स्वाभाविक नियमाप्रमाणे, इतर राष्ट्राने केल्यामुळें श्रीतुकाराम-रामदासांना तिच्यांत प्रत्यक्ष कार्यस्फूर्तीचा आवेश उत्पन्न करून श्रीशिवभूपाचा नंदादीप उजळता आला.

आजहि महाराष्ट्रांत, विशेषतः ब्राम्हणवर्गाच्या नित्यपाठांत श्रीगुरुचरित्राच्या इतका दुसरा कोणताच ग्रंथ नाही. वाङ्मयदृष्टीनेहि त्याची योग्यता

फार मोठी आहे. ज़िकडेतिकडे सारे यवनमय झाले असतां ज्यांत एक देखील यावनी शब्द नाही, असा हा एकच मराठी ग्रंथ आहे. त्यांत मुद्दाम काव्य आणलेलें नाही, परंतु जेथे कोठे तें ओघानें आलें आहे तेथे ते अत्यंत उच्च दर्जाचे आहे–किंबहुना असेहि म्हणतां येईल कीं, त्यांतील भावेचा स्वाभाविकपणा, प्रौढ, ( Classic ) म्हणून समजले गेलेल्या कोणत्याहि त्या वेळच्या मराठी वाङ्मयांत आढळणार आही. साने गुरुनी प्रसिद्ध केलेली लोकगीतें ज्याप्रमाणे मुक्तेश्वर वामनांच्या काव्यापेक्षा शतपटीने चटका लावतात, त्याचप्रमाणे श्रीगुरुचरित्रांतील रसपरिपोषाच्या स्वाभाविकतेने चटका लागतो. चरित्रविषय असलेली विभूति श्रीदत्तात्रयांचा साक्षात् विग्रह आहे, अशी भाविकांची श्रद्धा आहे. श्रीशैल्यावर श्रीगुरूंनी आपला अवतार समाप्त न करतां, फक्त देह गुप्त केला व त्या वेळेपासून, भक्तांच्या भावशरीरास गोचर होणाऱ्या आपल्या दिव्य शरीराने ते जगदुद्धाराचे काम अव्याहत करीतच आहेत. आणि म्हणूनच, त्यांची उपासना केली असतां, त्यांचा कृपाप्रसाद होऊन साक्षात् संबंध येतो व मनुष्यजीवाचे परमकल्याण होते, असें अनुभवी लोकांचे अनुभव आहेत. ब्रम्हर्षी अण्णासाहेब पटवर्धन यांनी तर असें लिहून ठेवलें आहे–

(१) अखंड एक, अनंत विश्व व सर्वव्यापक, सर्वज्ञ, सर्वसाक्षी, परब्रम्ह, परमेश्वर, परमात्मा सद्गुरु आहे. त्यांची वेदशास्त्रानुसार सेवाभक्ति करावी.

(२) श्रीभगवान गजानन, दत्तात्रय, श्रीपाद श्रीवल्लभ, हाच श्रीनरसिंह सरस्वती सद्गुरु आणि परमेश्वर परमात्मा आहे; व तो अवतार भूमीवर सदैव, नित्य–निरंतर आहे.

(३) त्या अवतारांत जशी अमानुष ( अद्‌भुत ) कर्मे करून भक्तांच्या अनुभवाला, परमेश्वरत्व आणून दिलें, त्या प्रमाणेच आताहि, त्याची सेवा केली असतां अनुभव येतो व तो सद्गुरु कृपा करतो.



श्रीगुरुचा अवतार सुमारें पांचशे वर्षांपूर्वी वऱ्हाडांतील प्राचीन काळची कुबेर नगरी जे सुप्रसिद्ध कारंजे शहर तेथे एका कौंडण्यगोत्री वाजसेनीय शाखेच्या श्रीमंत ब्राम्हणकुळांत झाला. नव्यानवसाने झालेलें हे मूल पाहून व त्याची अनेक शुभ लक्षणें अनुभवास येऊन मातापितरांस मोठा आनंद झाला; त्या बालकांविषयीं अद्‌भुत गोष्ट अशी होती कीं उपजतांच त्यानें ॐ असा गंभीर ध्वनी केला व पुढेहि ॐ चा उच्चार तो नित्य करीत असे. पण पुढे लवकरच असें दिसून आलें कीं, ॐकाराशिवाय याला दुसरें कांहीच बोलता येत नाही. पुष्कळ प्रयत्न व्यर्थ गेल्यानंतर, मुलगा मुका झाला अशी खात्री होऊन आईबापास अतिशय खेद झाला. तो सात वर्षांचा असतांना एकदां आई असा खेद करीत असतां, आपल्याला मौंजी बांधली असतां बोलत येईल असें त्या मुलानें खुणेनें दर्शविलें; व आपल्या शब्दावर आईबापांचा विश्वास बसावा म्हणून एक लोखंडाची सळई हातांत घेऊन तिचे सोनें करून आपल्या अतिमानुषतेची चुणुक दाखविली. पुढें व्रतबंध झाला. तेव्हांहि, गायत्री उपदेश वगैरे सर्व प्रकार मुकाट्यामुकाट्यानेंच झाला. परंतु मातृदेवता ज्या वेळेला भिक्षा घेऊन पुढें आली आणि 'बाळा वेदोच्चार कर' म्हणून तिने सांगितलें. त्यावेळीं, सात वर्षांच्या त्या मुक्या मुलानें 'अभिमिळे–' इत्यादि चारी वेदांच्या आरंभ–ऋचा अगदी शास्त्रोक्त पद्धतीने म्हणून दाखविल्या. व पुढे लगेच, "आता भिक्षा मागण्यांचा तूं आम्हास उपदेश केलाच आहेस तर त्याकरतां तीर्थाटन करण्याची व आजन्म ब्रम्हचारी राहण्याची आज्ञा द्यावी" म्हणून मातेस विनंती केली. आईने अर्थातच शोकाकुल होऊन त्याला अडथळा केला व निदान आणखी एक मुलगा होईपर्यंत जाऊं नकोस म्हणून निक्षून सांगितलें. तेव्हां, एकच तर काय पण, दोन मुलें होईपर्यंत आप जाणार नाही, असें मोठ्या संतोषाने सांगून श्रीगुरूंनी कांही काल तेथेच वास केला, व अध्यापन आणि उपदेश ह्यांनी कारंज्याच्या लोकांस पुनीत केलें. पुढे लवकरच–,आईस दिवस राहून यथाकालीं दोन जुळीं मुलें झालीं, तेव्हां

एकवीस वर्षानंतर पुन्हा दर्शन देईन असें आश्वासन देऊन मोठ्या कष्टाने आईची अनुज्ञा मिळवून श्रीगुरु काशी क्षेत्रांत आले. तेथे असताच श्रीशंकराचार्यांच्या शृंगेरी येथील शिष्यपरंपरेंतील एक वृद्ध व अधिकारी संन्यासी कृष्णसरस्वती यांच्यापासून त्यांना संन्यास दीक्षा मिळाली. तेथून ते बदरीवनास गेलें व अवतार कार्याची पूर्वतयारी होऊन लोकरहाटीप्रमाणें योगतपादि सर्व साधनें प्रत्यक्ष करून नंतर ते निरनिराळी तीर्थे करीत, आर्त जनांना साह्य करीत, भक्तजनांचा उद्धार करीत, सामान्य जनतेला धर्ममार्गावर आणून सोडीत, व शरणागतावर अनुग्रह करून त्यांना यथोचित अशी संन्यासादि दीक्षा देऊन शिष्यसांप्रदाय वाढवीत, व सांनिध्यांत आलेल्या सर्वांना यथाशक्त्या तपप्रवृत्त करीत, एकवीस वर्षानंतर पुन्हा आपल्या जन्मभूमीस परत आले. तेथे थोडासा मुक्काम करून पुन्हा दक्षिण भारताच्या यात्रेस निघाले. धाकटी बहीण रत्नाबाई, तपश्चर्येची आज्ञा मागत असतां पतीसेवा हींच पतिव्रतेची परम तपस्या, असा त्यांनी तिला उपदेश केला व तिच्या भवितव्यांत पती–वियोग, श्वेतकुष्ठ इत्यादि दुर्दैवी योग असल्याचे सांगून कुष्टी झाल्यावर गाणगापुरास येण्यास सांगितलें. गोदावरी तटाक यात्रा करीत असतां एका गांवात, पोटशुळाने जिवावर उठलेल्या एका ब्राम्हणास पोटभर खाऊं घालून त्यांनी बरें केलें. त्या प्रसंगीं ज्याचे येथे भिक्षा केली त्या सायंदेव ब्राम्हणावरती कृपा करून–त्याचे यवनभय नाहीसें केलें. त्याचा मुसलमान अधिकारी कमालीचा ब्राम्हणद्वेष्टा होता. परंतु उलट; श्रीगुरुच्या कृपेने त्यालाच भीति वाटून तो सायंदेवाला शरण आला. या प्रमाणे, 'पाठीं असतां तो जगजेठी। वरकड काय गुमान?' अशी आपल्या अलौकिक सामर्थ्याची प्रचीति देऊन पंधरावर्षानंतर गाणगापुरास भेटूं म्हणून सांगितलें. पुढे, यात्रा करतां करतां तासगांवाजवळ हल्लीं जेथे औदुंबर क्षेत्र आहे, तेथे श्रीभुवनेश्वरीचे पुरातन क्षेत्र होतें, तेथें एक चातुर्मास वास करून नरसोबाच्या वाडीस आले. तो प्रदेश त्या वेळेला शिरोळ गांवच्या हद्दींत मोडत असे. तेथे औदुंबराखाली



बारा वर्षे राहून, तेथे आपल्या पादुका स्थापन करून व त्या स्थानाला वर देऊन ते गाणगापुरास आले, आणि सुमारें बारा वर्षेपर्यंत तेथें नानाप्रकारच्या अद्भुत लीला करून असंख्य लोकांना सन्मार्गाला लावीत लावीत बेदरच्या यवन राजाचा दुःसाध्य स्फोटक आपल्या कृपाकटाक्षानें नाहीसा करून त्याला मागील जन्माची आठवण देऊन श्रीशैल्यपर्वतावर त्यांनी आपला स्थूल विग्रह गुप्त केला.

गाणगापुरास असतांना ज्या अद्भुत लीला श्रीगुरूंनी केल्या त्यांत वांझ महिषीला दुभविणें, वृद्ध वंध्येला संतति देणें, मृताचे पुनरुज्जीवन करणे, शुष्क काष्टास पल्लव आणणे, रस्त्याने जाणाऱ्या मांगास हांक मारून त्याच्याकडून वेदवादी पंडीतांचा पराजय करविणे, असल्या कांही अत्यंत अतिमानुष गोष्टी आहेत. हे सर्व चमत्कार खरोखरच घडलें किंवा काय आणि असें चमत्कार घडणें शक्य आहे काय, अशी शंका विसाव्या शतकांतील श्रद्धाहीन आणि केवळ बुद्धिप्रधान अशा कोरड्या टणठणीत अंतःकरणाच्या, स्वतःला जास्त सुधारलेले समजणाऱ्या माणसांस येणें साहजिक आहे. तिचा परामर्ष या छोट्याशा प्रस्तावनेंत घेणें शक्य नाही; व इतिहासकारास त्याची गरजहि नाही. असें चमत्कार होणे शक्य आहे किंवा नाही, हे त्याच्या दृष्टीने महत्वाचे नाही. असें चमत्कार होतात या गोष्टीवर, त्या काळच्या लोकांचा जिवंत विश्वास होता किंवा नाही, ही त्याच्या दृष्टीने महत्वाची गोष्ट आहे. फर्गुसन कॉलेजचे प्रोफेसर शर्मा यांनी असें म्हटलें आहे कीं, " The fact for the historian is not that, according to him, miracles did take place, but that the people sincerely believed that they did happen." Page 12 "Maratha History Reexamined." ते फार समर्पक आहे. त्या काळच्या लोकांमध्येच, असें चमत्कार घडतात आणि तसें गाणगापुरास घडलें अशी जिवंत समजूत होती असें नाही. आजहि तशी समजूत कोट्यवधी जनतेंत

आहे. त्याला वेगळा पुरावा नको. श्रीगाणगापूर क्षेत्राचें अस्तित्व व तेथील यात्रेकरूंची संख्याच हें सिद्ध करून देतें. परंतु असें चमत्कार, ही श्रीगुरूंची प्रसंगोपात्त घडलेली लीलाच आहे. त्या सर्वांचेहि धोरण मुर्दाड झालेल्या माणसास महाराष्ट्र धर्मांत स्थिर करणे, त्याची अभिमानज्योति जागृत करून त्याच्या हृदयांत आशेची ज्योत प्रेटविणे, परमेश्वर पाठीराखा असल्याची प्रचीति त्याला देऊन त्याच्यांत धैर्य, पराक्रम आणि उद्योग ह्यांची स्फूर्ति उत्पन्न करणे व अशा रितीने मुसलमानी आक्रमणाने आलेली प्रज्ञा हतता नाहीशी करून महाराष्ट्राला पुन्हा जिवंत करणे व सद्गुणसंवर्धन करून मराठा गड्याला श्रेष्ठ प्रतीचा माणूस बनविणे, हेंच होतें. सायंदेवास त्यांनी आज्ञाच केली होती कीं, "जरी आम्हा पाशी राहशी। तरी त्वां न बंदिजे म्लेंच्छासी." श्रीगुरूंची उपासना करणाऱ्या प्रत्येकाने यांतील मर्म लक्षांत ठेवणें अवश्य आहे.

तेव्हांपासून आज तागायत गाणगापुरचें माहात्म्य व श्रीगुरूंची उपासना वाढत्या प्रमाणावर आहेत. उपासना म्हटली म्हणजे तिच्या अनेक अंगांत मानसपूजा हे एक महत्वाचे अंग आहे, व तिचे महत्वहि तसेंच आहे. श्रीसमर्थांची तर अशी आज्ञा आहे कीं, "मानसपूजा नित्य नेमाने अगत्य घडली पाहिजे." या सांगण्यांत, नुसतें शास्त्रीयच नव्हे तर राष्ट्रीय महत्वहि आहे. मानसपूजा हे भावयोगाचे आवश्यक अंग आहे व ध्यानसिद्धीची पायरी म्हणून तिचें खरें महत्व आहे. परंतु ती अप्रत्यक्ष रितीनें राष्ट्राचें वैभव आणि ऐश्वर्य वृद्धिंगत करण्यास साह्य करते. कै० रामराव कृष्ण जठार यांनी आपल्या 'स्वानंद-साम्राज्य' या वेदान्त ग्रंथांत उपासना खंडांत या विषयाचा मोठा मार्मिक विचार केला आहे. ध्यानाचे सामर्थ्य असें आहे कीं, तेथें उत्पन्न झालेला संकल्प बाह्य जगांत स्थूल स्वरूप धारण करून प्रगट होतो. मानसपूजा स्थूल होऊन ध्यानाच्या अभ्यासावर पाऊल पडण्याच्या वेळीं, अनेक साधकांचें असे



अनुभव आहेत कीं, त्या सूक्ष्मावस्थेंतील कित्येक विषयांची प्रतीति बाह्य जगांत मोंवताली असणाऱ्या माणसाला देखील येतें. उदाहरणार्थ, मानसपूजेंत अनंताचे फूल अर्पण केलें असलें तर बाहेरील माणसांना प्रत्यक्ष अनंताचा वास येऊं लागतो. वऱ्हाड-नागपूर सारख्या ठिकाणीं ही गोष्ट आश्चर्यकारकच आहे. विशेष अधिकार वाढला असतां त्यांतील इतर वस्तुहि बाह्य जगांत उत्पन्न झाल्याशिवाय राहत नाहींत. मानसपूजाच म्हटली म्हणजे तेथें कशाचा तोटा आहे? व कशाची अडचण आहे? श्रीसमर्थांनी म्हटलेंच, आहे 'मना तेथे काय दुकाळ'? मोटमोठ्या सम्राटांनाहि दुर्मिळ अशा पदार्थांची भावना मनुष्य करूं शकतो व तशीच ती त्याने करावी. कोणत्याहि प्रकारें करंटेपणा करूं नये. तसें केल्यास कल्पवृक्षाखाली बसून भिक्षेची चिंता करण्यासारखे होईल. मानसपूजा कशी करावी याचा धडा देतांना श्रीमत् आचार्यांनी 'रत्नैःकल्पित मानसम्' असाच धडा दिला आहे. मानसपूजेचा सार्वत्रिक प्रघात असला तर, त्या अनेक उपासकांतून ध्यानसिद्ध असे सहजच मोठ्या प्रमाणावर मिळतात व त्या सर्वांच्या भावनांचा एकीकृत परिणाम त्या सुवर्ण वस्त्रादिक वस्तू व ते राजैश्वर्य देशांत प्रत्यक्षपणें प्रगट होण्यांत होतो, अशी या विषयासंबंधीची आमच्या शास्त्रांची धारणा आहे.

श्रीगुरूंच्या उपासकांना मानसपूजेची पद्धती कळून तिचा अभ्यास करण्यास सुलभ जावे म्हणून श्रीगुरूंचे कोणी एक भक्त गोपाळ कवि, यांनी एक स्तोत्र रचलें आहे. हे गोपाळकवि कोण आहेत, याविषयीं कांहीच माहिति उपलब्ध नाही. आणि संशोधन करून देखील 'जन्म घेति ते कोणत्या कुळीं। वसति नित्य ते कोणत्या स्थळीं।' याचा पत्ता लागेल किंवा नाहीं याची वानवाच आहे. आणि त्याची आवश्यकता तरी काय आहे? कोणीहि असो! श्रीगुरु चरित्राच्या ४६ व्या अध्यायांत असें वर्णिलें आहे कीं, नरकेसरी नांवाच्या कवीनें श्रीगुरूंच्या मानसपूजेचें विधान चांगलें स्पष्ट केलें आहे. हा

केसरी आडनांवाचा कवीच प्रस्तुत स्तोत्रकर्ता असावा असें वाटतें. आणि हा तर्कही कांहीं वाऊगा नसावा. कारण आजही श्रीआळंदीस श्रीज्ञानेश्वर-चरणसेवापरायण असलेलें केसरी नांवाचें ब्राम्हणकुळ हयात आहे. या मानसपूजेवरून गोपाळ कवीचें भक्तिभावानें ओथंबलेलें अंतःकरण दिसून येतें. श्रीगुरूची एक निरपेक्ष सेवा म्हणून हा कल्याणविषय त्याने भाविक जनापुढें ठेवला आहे, त्याला स्वःतला लौकिकाची यत्किंचितहि चाड नाही. ह्यांतच त्याचें मोठेपण दिसून येतें. या मानसपूजेचा उपयोग करून घेऊन भाविकांनी कृतार्थ व्हावे, एवढीच त्याची अपेक्षा आहे व तेवढा आनंद त्याच्या आत्म्यास देऊन ऋणमुक्त होण्याची जबाबदारी श्रीगुरूभक्तांवर आहे. श्रीमत् आचार्यांचे ' चतुःषष्ट्युपचार-मानसपूजा स्तोत्र ' म्हणून एक श्रीजगदंबास्तोत्र आहे. गोपाळकवीने आपले स्तोत्र त्याच धर्तीवर रचलें असावे, असें पहिल्या श्लोकावरून वाटतें.

*उषसिमागधमंगलगायनैः । झटिति जागृहि जागृहि जागृहि ॥*
*अतिकृपार्द्रकटाक्षनिरीक्षणैः । जगदिदं जगदंब सुखी कुरू ॥*

या आचार्यांच्या श्लोकासह गोपाळकवीचा

*श्रीमन् नमोऽस्तु नरसिंह सरस्वतीश ।*
*गीतैः शुभैः झटिति जागृहि पाठकानाम् ॥*
*कारुण्यपूरितकटाक्षदशांप्रसारै ।*
*रेतज्जगत् सुखय भानुरुदेष्यतीतः ॥*

हा श्लोक वाचला म्हणजे माझे म्हणणे लक्षांत येईल. त्या स्तोत्राप्रमाणेच हें स्तोत्रहि नितांत मधुर आहे. उत्तम काव्याचें सारे गुण त्यामध्ये आहेत. प्रसाद आहे, माधुर्य आहे, सुगमता आहे, वृत्तवैचित्र्य आहे. असें हें स्तोत्र नित्य पठनांत ठेवून त्याच्या साह्याने मानसपूजेचा अभ्यास केला असतां



साधकास मोठा लाभ होईल, असे जाणून आमचे मित्र, श्री. मंदार भास्कर जोशी यांनी ते प्रकाशित करण्याचे ठरविलें. याबद्दल, भाविक जनता त्यांना धन्यवाद दिल्याशिवाय राहणार नाही, अशी माझी खात्री आहे. आपला संकल्प पुरा करण्याकरितां त्यांनी जे परिश्रम घेतले आहेत, तेहि प्रशंसनीय आहेत. प्रत्येक श्लोकाचे सरळ सुबोध भाषांतर दिलें असून संस्कृत कठीण शब्दावर टिपाहि दिल्या आहेत. काव्यांत गोस्तनासारखे अपरिचित शब्द कित्येक आले आहेत. त्यांवर टीपा आवश्यक होत्याच. सारांश, सर्व तऱ्हेने साधकांना जास्त उपयोग व्हावा अशी या प्रकाशनाची श्री. जोशी यांनी काळजी घेतल्याबद्दल, व हे स्तोत्र प्रकाशित करण्याचा संकल्प त्यांनी मनांत धरला त्याबद्दल, मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. ही त्यांची सेवा श्रीगुरूस मान्य होऊन या स्तोत्राच्या योगाने भक्तजनांस साह्य होवो, एवढीच, त्या श्रीगुरूचरणांजवळ माझी नम्र प्रार्थना आहे.

**अप्रबुद्ध**

**श्रीगणेशाय नमः । श्रीदत्तात्रेयाय नमः**

ॐ अखिल धरणी मंडलास मण्डन असलेली सर्वगुणपूर्ण अशी जी निजसत्कथारूपी आकाशगंगा तिच्या योगें भुवनत्रयास ज्यांनी पवित्र केले आहे, भक्तजनांच्या मनांतील सन्देह ज्यांनी निःशेष नाहीसा केला आहे, नाना उपाधींच्या योगें अनिर्वचनीय अशा आवरणविक्षेपात्मक दोन शक्तींनी युक्त अशी जी अविद्या तिनें उत्पन्न केलेल्या त्रिविध कर्माच्या सकल बीजांचें ज्ञाना-ग्नीनें भर्जन केल्यामुळें ज्यांचा संसार अंकुरितच झाला नाही, ज्यांनी संतत तितिक्षेचा अवलम्ब केला आहे, अज्ञानरूपी गाढ अन्धकारामुळें अमावास्येच्या रात्रीप्रमाणें बनलेली जी मूळजनांची बुद्धी तिला प्रकाशित करण्यासाठी ज्यांची दया दिनकरोदयाप्रमाणें उदयास आली, निरंतर ज्यांनी कृष्णानगरीच्या तीरावर लीलाविहार केला, ब्रम्हदेवाप्रमाणें ज्यांचे वदन सरस्वतीच्या विलासाचें स्थान होतें, विष्णूप्रमाणें ज्यांनी शंखचक्र हाती धारण केले आहेत. शंकराप्रमाणें

ज्यांनी वृषभध्वजाचा ( धर्माचे ध्वजाचा ) अंगीकार केला आहे, इन्द्राप्रम
विबुधांचें ( देवांचें, सज्जनांचें ) पालन करण्यांत जे तत्पर असतात, समु
प्रमाणें 'अपारजलरूप ( अपार आनंदरसस्वरूप ) असे, चंद्राप्रमाणें
लोकांस तृप्त करणारे, सूर्याप्रमाणें सर्व लोकांस बान्धवतुल्य असणारे, धन
न्तरीप्रमाणें दुष्ट भवरोगाचें निवारण करण्यांत धुरंधर, वसंत ऋतूंप्रमाणें
सुमनांच्या ( फुलांच्या, सज्जनांच्या ) समूहाचें आश्रयस्थान असलेले, पर
रामाप्रमाणें विरोधिजनांचे ( शत्रूंचे-वादिजनांचें ) निवारण करण्यांत चतु
श्रीरामाप्रमाणें शरणागतवत्सल, याप्रमाणें अनेक गुणगणरूप रत्नें धार
करणाऱ्या समुद्राप्रमाणें असणारे श्रीनरसिंहसरस्वती योगिचन्द्र, पद्म पता
अंकुश वगैरे अनेक शुभ लक्षणांनी युक्त अशा आपल्या चरणकमलांचे
विन्यासानें पृथ्वीस धन्य करीत, भक्तजनांस तारण्याकरता सर्वत्र स्वेच्छे
संचार करीत, पतिव्रतामृतपतिसंजीवनादि अलौकिक चरितांनी सर्वां
आश्चर्यचकित करीत विहार करीत असत अशी पौराणिक कथा ऐकून मनां
कुतूहल उत्पन्न होऊन श्रीदत्तात्रेयांचे प्रत्यक्ष अवतार असलेल्या त्यां
साक्षादीश्वर मानून अन्तरंगात स्वतःच्या कल्याणाच्या इच्छेनें, मानसपू
ही भक्तजनांवर उपकार करण्याच्या दृष्टीनें मुक्तीच्या साधनांत अत्यंत वरि
आहे असे जाणून तिच्या योगें त्या श्रीभगवान् नृसिंहाची कृपा संपाद
करण्याच्या इच्छेनें श्रीगोपाल कवि ही ( मानसपूजा ) रचीत आहे.

## अथ श्रीमन्नृसिंहसरस्वतीमानसपूजाप्रारम्भः

१. हे श्रीमन् नरसिंहसरस्वतीप्रभो, स्तुतिपाठकांच्या मंगल गीतांनी
तुम्ही त्वरित जागृत व्हा. तुम्हास नमस्कार असो. हे कारुण्यपूर्णनयना, आपल्या
दृष्टिपातांनीं या जगास सुखी करा. कारण हा इकडे इतक्यांत सूर्य उदयास येईल

२. ज्यांनी आपल्या अचिन्त्य महान् प्रभावामुळें निरक्षरमुखानें लीलेनें
सर्व वेद पढविले, त्या अमेय व पूजनीय अशा भगवान् नरसिंहसरस्वतीप्रभूंना
मी आवाहन करतो.



३. हे योगिन्, गण्डस्थलातून स्रवणाऱ्या उत्कट मदजलाच्या लोभानें ज्यावर भ्रमर जमले आहेत, जो उज्ज्वल अशा चार दातांनी रम्य दिसत आहे ज्याच्या पृष्ठ भागावर अतुलनीय अशी झूल पांघरली आहे अशा गजावर आरोहण करून मोठ्या प्रेमाने माझ्या घरांत प्रवेश करा.

४. हे योगिन्, सुवर्णाच्या उंच उंच वेदींनी शोभणारें, उत्तुंग ध्वजानें उद्धासित, नाना तऱ्हेच्या कलामय रांगोळ्यांनीं नेत्रांस आनंद देणारें, मोत्यांच्या जाळ्यांनीं ज्याच्या आंतील भाग नटविला आहे असें, गंगाजलपूर्णकुम्भांनी दीप्तियुक्त असें, लीलाविहार करण्यास योग्य असें मनोहर मन्दिर मी तुम्हास अर्पण करतो.

५. ज्यास उत्कृष्ट ( धातूच्या ) पत्र्यांनी मढविलें आहे व ज्यावर कोमल पल्लव व ताजीं पुष्पें आंथरली आहेत अशा प्रशान्त प्रभेनें युक्त अशा पीठावर हे भगवन् तुम्ही बसावें.

६. कमलें, कण्हेर, कुन्द, पारिजातक, मोगरा, बकुळी वगैरे पुष्पांच्या ईषद्विकसित कलिकांनी संमिश्र व कस्तूरी कापूर यांच्या सुवासानें आनंद देणाऱ्या दिव्य सुगंध द्रव्यांनी युक्त असें पाद्यजल, हे यतिकुलश्रेष्ठा, मी आपल्या चरणांवर समर्पण करतो.

७. दिव्य पुष्पसंभाराच्या गंधानें सुवासित व सुगन्धी पुष्पें; अक्षता यांनी युक्त, अशा गंगादि उत्तम तीर्थांतून आणलेल्या जलांनीं, हे नरसिंहा, मी तुम्हास आदरपूर्वक अर्घ्य अर्पण करतो.

८. कर्पूराच्या सुगन्धानें संभरित व नवीन गव्हल्याच्या मधुर वासानें युक्त असें जल, हे नरसिंहसरस्वती प्रभो, तुम्हास ( अंगावर मार्जन करण्यास ) आचमन करण्यास मी अर्पण करीत आहे.

९. हालणाऱ्या मोत्यांच्या सरांनी युक्त व रत्नांच्या उंच स्तंभांच्या अग्रांवर उभारलेलें अत्यंत मूल्यवान व आमच्या आवडीचें असें छत्र, हे नरसिंह योगिन्, आम्ही तुम्हास अर्पण करतो.

१०. मध, दही, गूळ, दूध व तूप यांनी युक्त असा मधुपर्क हे यतिश्रेष्ठा, नृसिंह योगिन्, चंचलमति असा मी भक्तियुक्त अंतःकरणानें तुम्हांस अर्पण करतो. तुम्ही मजवर नित्य करुणापूर्ण कटाक्ष फेका.

११. हे योगिश्रेष्ठा, सर्व मलापकर्षणपूर्वक तुम्हास स्नान घातल्यावर मी आनंदानें तुम्हांस दही, मध, दूध, साखर व तूप अशा पंचामृतानें स्नान घालतो.

१२. हे योगिवर्य स्वामी, गंगा वगैरे तीर्थांतून आणलेल्या कर्पूरसुगन्धयुक्त अशा मनोरम जलप्रवाहांनीं ( घातलें गेलेलें ) शुद्धोदक स्नान अत्यंत आनंदानें स्वीकारा.

१३. शरच्चंद्राप्रमाणें ज्याची कान्ति आहे अशा स्वच्छ उत्कृष्ट वस्त्रानें, अत्यंत आनंदाने, हर्षयुक्त चित्तानें भक्तिपूर्वक तुमच्या आर्द्र देहाचें उद्वर्तन मी आवडीनें करतो ( मी आपलें आंग पुसून काढतो. )

१४. रत्नें व सुवर्ण यांनी चित्रविचित्र अशा पुढें ठेवलेल्या नवीन पादुकांवर, हे नरसिंहसरस्वतीशा, हृष्ट चित्तानें तुम्ही कृपा करून पावले ठेवा.

१५. हे योगिन्, शंख, मुक्ताहार, हिम व हिरा याप्रमाणें प्रकाशणाऱ्या शुभ्र, सर्वदुःखनिवारक अशा निर्मळ भस्मानें, हे करुणाभूषणा, आपलें अंग हर्षपूर्वक भूषित करा.

१६. बन्धूकपुष्पाप्रमाणे उज्ज्वल, कान्तीनें रम्य, काषाय रंगाच्यां भूषणांनीं युक्त, अत्यंत नरम व पीळदार अशा तन्तूंचें बनविलेलें, मोत्यांनीं युक्त दशा असलेलें, चित्तास संतोष देणारें अत्यंत शुद्ध असें वस्त्र अत्यंत आनंदानें मी देत आहे. तें हे नरसिंहयोगितिलक, स्वामिन् तुम्ही प्रीतीनें स्वीकारा.



१७. लालसर रंगानें हृदयंगम, मनोहर प्रभेनें युक्त, जरीच्या धाग्यांनी रंजित असें खांद्यावर धारण करण्याचें, अनुपम सुगंधांनी युक्त असें असामान्य उत्तरीय वस्त्र हे कृष्णातीरविहारिन्, स्नेहपूर्ण स्वामिन्, तुम्ही ग्रहण करा.

१८. हे श्रीमन् नृसिंहा, तुम्हास आवडणाऱ्या पुष्पांच्या मालांनी शोभिवंत असें तुमचें अंग हे दयानिधे, मी दण्ड, कमण्डलु, शंख व चक्र यांनी विभूषित करतो.

१९. सुगंधितद्रवानें युक्त, तसेंच कमलांतील उज्ज्वल परागानें संमिश्रित अशा चंदनानें, हे योगिराजा, मी कौतुकानें तुमच्या भालप्रदेशीं तिलक लावतो.

२०. हे नरसिंह योगिन्, कापुराच्या सुगंधाने युक्त व चंदनाच्या गन्धानें युक्त अशा दिव्य उटीनें मी तुमचे शरीरास विलेपन करतो.

२१. हे दयानिधे, शरदृतूतील चंद्रकलेप्रमाणें चमकणाऱ्या, हृदयास आनंद देणाऱ्या अशा मंगलरूप अक्षता मी तुम्हास प्रेमाने विधियुक्त समर्पण करतो. त्यांचा कृपा करून स्वीकार करा.

२२. हे नरसिंह योगिन्, अशोक, चांफा, कमलें, मोगरा, मधुमालती, गुलाब, दुपारी वगैरे दिव्यपुष्पांनीं व तुलसीदलांनीं मी तुमचें अर्चन करतो.

२३. नवीन गुग्गुळापासून उत्पन्न झालेला, कपिला गाईच्या तुपानें पेटविलेला, रेणुकबीज नांवाच्या सुगंध द्रव्यानें सुगंधित अशा तुपानें अगरूजन्य असा घ्राणेन्द्रियास तृप्त करणारा धूप कृपा करून स्वीकारा.

२४. गाईच्या तुपानें सिक्त अशा तीन वातींनी युक्त, मोहान्धकार हरण करण्यांत प्रवीण असा मनोरम दीप हे योगिन् तुम्ही प्रेमानें ग्रहण करा.

२५. हिंग, जिरे, आलें ज्यांत टाकले आहे अशा मनोहर भाज्या उत्तम कालवणें, दुधाचे पदार्थ, पापड वगैरे पदार्थ, नवीन नवीन हृद्य अशा तोंडी लावणीं, नाना तऱ्हेचे भक्ष्य पदार्थ, दूध, दही, तूप, मध, तसें द्राक्ष, केळ, आम्र वगैरे वृक्षांची फळें यांसह, हे यतिपते, हें शाल्यन्न (उत्तम तांदुळांचा भात) तुम्ही स्वीकारा.

२६. कढी, तूप वगैरेनीं परिपूर्ण अशा अनेक वाटयासहित अशा सुवर्ण पात्रांतून पूर्वापोशन घेऊन नैवेद्य ग्रहण करा.

२७. मध्ये मध्ये सुगंधित अतिशीतल व मधुर असे सुवर्णपात्रांत असलेले, मी अर्पण केलेलें जल, हे नृसिंह योगिन्, तुम्ही स्वीकारा.

२८. हे श्रीमान् नृसिंह योगिन् तुम्हांस नमस्कार असो. हें सरस अन्न यथेष्ट ग्रहण करून आनंदित अंतःकरणानें या पाण्यानें, मान्य लोकांचे नित्य-कृत्य असें उत्तरापोशन तुम्ही करा.

२९. कापुराचा वास ज्यांत दरवळला आहे अशा तीर्थांतून आणलेल्या कोमट पाण्यानें हे योगिन् आपले करकमलद्वय आनंदानें तुम्ही प्रक्षाळण करा.

३०. कापुराच्या सुवासानें युक्त अशा या आकाश गंगेच्या निर्मल व अतिशीतल सुंदर पाण्यानें हे नरसिंह योगिन् तुम्ही आचमन करावें व प्रसन्न अन्तःकरणानें मजवर कृपादृष्टि करावी.

३१. तप्तकांचनाच्या प्रभेनें चमकणाऱ्या (वर्ख लावल्यामुळें) नरम पानानी युक्त, काथ व सुपारीचा कातरा यांनी मिश्रित, सुगन्धभरित असा विडा, हे कृपानिधे, तुम्ही आवडीनें ग्रहण करा.



३२. रत्नें व कांचन यांनी निर्मित अशा नवीन पात्रांत गाईच्या तुपात भिजविलेल्या वाती ज्यांत ठेवल्या आहेत अशा अनेक दीपांनीं, हे देवा मी तुमची मंगलारती करतो. हे योगिन्, तिचा स्वीकार करा.

३३. हे योगिन्, मी तुम्हांस बहुमुल्य कर्पूरगरतीचे नीरांजन पात्र समर्पण करतो, त्याचे हे योगिन, कृपां करून ग्रहण करा व हे नृसिंह, माझ्या चित्तातला निबिड अंधकार समूळ नाहीसा करा.

३४. चक्र, पद्म, अंकुश, वज्र, शंख वगैरे दिव्य चिन्हांनी प्रकाशमान अशा तुमच्या चरणयुगुलांवर हें नरसिंह योगिन्, मी पुनः आदरपूर्वक अर्घ्य समर्पण करतो.

३५. भूमीवर गुडघे टेकून व आरतीचे पात्र मस्तकाजवळ धरून, हे यतिवर्या, तुमच्या मुखाजवळून ते मी तीनदा ओवाळतो.

३६. पारिजातक, मोगरा, कण्हेरी, कुन्द, पुंनाग, चमेली, बकुळीं, कमलें व मनोहर बिल्वदलें यांनीं हे योगिवरा, तुम्हांस मी पुष्पांजलि समर्पण करतो.

३७. नवीन रत्नांच्या जाळ्या, मोत्यें, सुवर्णाच्या सुपाऱ्या, स्नेहपूर्वक, मधुर जयशब्दपूर्वक उधळून तुमचे पूजन केल्यानंतर सुवर्णखचित रत्नसंभार हे कृपाळू यतिवरा, नृसिंह योगिन्, मी तुम्हांस दक्षिणा म्हणून देतो.

३८. उदय पावणाऱ्या चंद्रमंडळासमान, मोत्यांच्या गुच्छांनीं ज्याचे अग्र शोभित केले आहे असे दिव्य, बहुमूल्य दण्डयुक्त असें छत्र, हे नरसिंह योगिन्, मी स्वहस्ताने तुमच्या शिरावर धरतो.

३९. दिव्य कांचनाने ज्यांचे दण्ड चमकत आहेत व नवीन मोत्यांच्या सरांनी ज्यांचा अग्रभाग सुशोभित केला आहे अशा, मौतिकहार, हिरा व चंद्र याप्रमाणें शुभ्र अशा चामरांनी हे यतिपते, मी आपली सेवा करतो.

४०. मनोहर किरणांनी दर्शनीय अशा अत्यंत निर्मल अशा दर्पणांत हे नरसिंहसरस्वती प्रभो, आपली दिव्य तेजोमय मूर्ति तुम्ही आनंदाने पहा.

४१. सुवर्ण कलशाप्रमाणें शोभणाऱ्या कुम्भांनी ज्याचा अग्रभाग प्रकाशित केला आहे, ज्याला जातिवंत असे चार घोडे जोडले आहेत, ज्याची शोभा प्रेक्षणीय असल्याने जीं रमणीय आहे व कर्णपुटांस आनंदविणाऱ्या मुखर अशा हलत्या घंटिकाजालांनी अत्यंत मनोरम असा रथ, हे यतिकुलश्रेष्ठा, मी तुम्हास अर्पण करतो.

४२. तरल अश्व व मस्त हत्ती यांच्या समूहांनी मनोरम व रथसमूह व पदातिव्रज यांच्या संचारानें सुंदर दिसणारें मी अर्पण केलेलें हें चतुरंग सैन्य, हे कृपाळू यतिवरा, हृष्टचित्तानें तुम्ही स्वीकारा.

४३. चातुर्यातिशययुक्त अशा नृत्यमहोत्सवामुळें जी अत्यंत दर्शनीय आहे, जी सौन्दर्याची भूमि असून जींत असमान्य वयाच्या नटांचे विलास दाखविले आहेत, अशी ही चित्रपटीरूप नटी, सभेंत उधळलेल्या पुष्पांनी शोभणाऱ्या हे नृसिंह योगीश्वरा, तुमच्या हर्षास कारणीभूत होवो.

४४. तत्थेय्य, तथेय्य, थोंग, थोंग असा नाट्यानुरूप स्पष्टपणें तालदर्शक चित्तास आनंदविणारा शब्द, हे नरसिंहसरस्वतीश्वरा, तुमच्या चित्तांत हर्ष उत्पन्न करो.

४५. दुन्दुभि, मृदंग, झल्लरी वगैरे मोठमोठ्या वाद्यांचा मनोहर निनाद, हे यतिवर्या नृसिंहा, तुमच्या चित्तास सकुतुक आनंद देवो.

४६. मी सहस्रवदन शेष नव्हे. मी सहा मुखांचा कार्तिकस्वामी नाही. मी पंचमुख शंकर नव्हे किंवा चतुर्मुख ब्रम्हदेवसुद्धा नाही. तेव्हां तुमच्या निःसीम अशा लोकोत्तर गुणांचे वर्णन करण्यास, हे मृतद्विजप्राणदात्या, प्रथितयश यतिवरा, मी कुठून समर्थ होईन ?



४७. जिच्यायोगें पावलोपावली शंभर अश्वमेधांचे व महाधेनुदानाचे फल प्राप्त होते अशी प्रदक्षिणा, हे नृसिंह योगिन्, मी तुम्हास वारंवार भक्तिपूर्वक करतो.

४८. विज्ञानामृताचे सेवनाची आवड ज्यांस आहे, अखिल विश्वांत उत्कृष्ट असा ज्यांचा अवतार आहे, ज्ञानामुळें ज्यांचेपासून अंधःकारपटल गळून गेलें आहे, विद्वज्जनांस ज्यांचेयोगें आनंद होतो, सर्वत्र विश्रुत अशा उज्ज्वल कीर्तीनें अधिकच प्रकाशमान अशा श्रद्धायुक्त जनांस चिन्तामणीप्रमाणे असणाऱ्या, विनयानें आकळणाऱ्या श्रीनृसिंहगुरूंना चित्ताच्या शांतीस्तव मी भजतो.

४९. अनेक जन्मांत सांचून आतां प्रकट झालेल्या दोषपरम्परेनें उत्पन्न झालेला जो वेडीसारखा पाश, त्यामुळे ज्याचा बोधरूपी अक्षय निधि गळून गेला आहे, असा मी अत्यंत असार अशा संसारचक्राच्या उदधीत बुडून गेलो आहे. हे यतिवर्या नृसिंहा, मला स्नेहपूर्ण दृष्टीनें यांतून बाहेर काढा.

५०. अभिनव रत्नांच्या गच्चीवर, फुलांच्या जाळ्यांनी बनविलेल्या अत्यंत नरम उत्कृष्ट वस्त्रानें आच्छादिलेल्या, चमकणाऱ्या रत्नदीपांनी प्रकाशमान उशा-गिरद्या यांनी युक्त अशा दिव्य मंचकावर स्थित असलेल्या अनुपमबोध श्रीनृसिंहांचे मी ध्यान करतो.

५१. एकान्ती स्वात्मपरात्मैक्यरूप ज्ञाननिष्ठा दृढ राखून आपल्या चिद्रूपानुभावानें उत्कृष्ट, आनंदाने परिपूर्ण असणाऱ्या हे श्रीनृसिंह योगीश्वर आपल्या हृदयकमलांत या सेवकाचीही आठवण ठेऊन तुम्ही सुखानें शयन करा

५२. गोपालसूरीने रचिलेली श्रीमन्नृसिंहयतींची ही मनानें करण्याची मनोरम पूजा आपल्या प्रभावाने मोहरूपी अन्धकार हरण करीत होत्साती पठण करणाऱ्या जनांचें नित्य कल्याण करो.

ॐ तत्सत् । इति श्रीमन्नृसिंहसरस्वतीमानसपूजा समाप्ता

ज्याची मूर्ति शान्त आहे, जो ( हिमालयाचे ) शिखरावर शयन करतो, ज्याचा कण्ठ नील आहे, जो देवांचा देव आहे, विश्वाचा आधार आहे, जो स्फटिकसदृश शुभ्रवर्ण व शुभांग आहे, जो गौरीचा प्रियकर असून ज्यास तीन नेत्र आहेत, जो योग्यांना ध्यानानें आकळणारा, भवभयाचें हरण करणारा व सर्व लोकांचा एकच नाथ आहे, अशा शंकरास मी वन्दन करतो.

---

वसंत तिलका १, २, ३, ३०, ३८, ४३, ४६, ५२.
शार्दूल विक्रीडितम् ४, १६, २५, ४८.
वैतालीय ५, ८, ३१.
मालिनी ६, १०, १७, ३७, ४१, ४२, ५०, ५१.
इंद्रवज्रा ( वंशस्थ मिश्र ) ७, वंशस्थ ४७.
इंद्रवज्रा ९, १२, २४, ३६.
गीति ११, १४, २६, २७, २९, ४०.
माल्यधाराऔपच्छंदिक १३, १५, २१, ४४.
उपजाति १८, २०, २२, २८, ३३, ३४.
स्वागता १९, २३, ३२, ३९.
अनुष्टुभ ३५. रथोद्धता ४५. पृथ्वी ४९.
मन्दाक्रांता शिवस्तुति